# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि. २८ जानेवारी, २०२५

जळगाव दि.२८ ( प्रतिनिधी) :-  कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागातर्फे लोकशाही सप्ताह साजरा करण्यात येत असून या अंतर्गत वक्तृत्त्व  स्पर्धा व मतदार जागृतीपर भित्तीपत्रक स्पर्धा घेण्यात आली.

दि.२५ जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही सप्ताह साजरा करण्यात येत आहे. वक्तृत्व स्पर्धेत १५ स्पर्धकांनी भाग घेतला.  या स्पर्धेसाठी जागरुक मतदार-लोकशाहीचा आधार, प्रलोभन मुक्त मतदान ही बळकट लोकशाहीची नांदी आणि एक राष्ट्र एक निवडणूक हे विषय देण्यात आले होते.  परीक्षक म्हणून डॉ.रवींद्र माळी, डॉ.तुषार रायसिंग व डॉ.गौतम भालेराव यांनी काम पाहिले.  समन्वयक म्हणून प्रा.नेहा पाटील यांनी काम पाहिले. भित्तीपत्रक स्पर्धेत १९ स्पर्धकांनी भाग घेतला.  या स्पर्धेसाठी माझे मत माझे भविष्य, सोशल मिडीयाचा मतदान प्रक्रियेवर होणारा प्रभाव आदी विषय देण्यात आले होते.  परीक्षक म्हणून डॉ.राजू निकम, डॉ.जे.व्ही. पाडवी यांनी काम पाहिले. समन्वयक म्हणून प्रा. प्रदीप गोफणे यांनी काम पाहिले.  यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. अजय पाटील, विभागप्रमुख डॉ. उमेश गोगडीया तसेच प्रा.रोशन मावळे, प्रा.शेख मोईन उपस्थित होते.

बातमी क्र. २

जळगाव दि.२८ ( प्रतिनिधी) :-  कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास व संशोधन केंद्राच्यावतीने सुरु असलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडयात सामाजिक, राजकीय, ग्रामीण, निसर्ग आदी विषयांवर मान्यवर कवींनी सादर केलेल्या कवितांमुळे कवी संमेलन रंगले.

या कवीसंमेलनात प्रभाकर शेळके (धुळे), संतोष पावरा (शहादा), शशिकांत हिंगोणेकर, संतोष साळवे, माया धुप्पड (सर्व जळगाव) व अक्षय घोरपडे (जामनेर) या सर्वांनी ताकदीच्या कविता सादर केल्या.  अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक प्रा.म.सु.पगारे होते.  संतोष पावरा यांनी संविधान, संतोष साळवे यांनी लोक शहाणे का होत नाही व मायेचा ओलावा, अक्षय घोरपडे यांनी तुझे मत काय व कॉम्रेड चर्चा तर व्हायलाच हवी, शशिकांत हिंगोणेकर यांनी माझ सार्वभौमत्व आणि सगळयांना उजेड मिळो या कविता सादर केल्या.  प्रभाकर शेळके यांनी मुलाखत व गावाकडे जाणे का होत नाही, माया

धुप्पड यांनी सर्व हक्क सुरक्षित व नभ हे पावसाळी या कविता सादर केल्या. प्रा.म.सु.पगारे यांनी अध्यक्षीय समारोपात कवितांवर भाष्य करुन बाप व हे मृत्यो या कविता सादर केल्या. डॉ. दीपक खरात यांनी सुत्रसंचालन केले. डॉ.सुदर्शन भवरे यांनी आभार मानले.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनंसपर्क अधिकारी